बैंक ऑफ महाराष्ट्र
Bank of Maharashtra
भारत सरकार का उद्यम
एक परिवार एक बैंक

आज़ादी का अमृत महोत्सव

**निगमित संप्रेषण और निवेशक संबंध**
प्रधान कार्यालय: लोकमंगल, शिवाजीनगर, पुणे-5
टेली -020 :25614495, 25614366, 25514501 से 12 विस्तार

# वृत्तपत्रीय निवेदन

## स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवा निमित्त बँक ऑफ महाराष्ट्र तर्फे प्रतिमावर्धन सप्ताह महोत्सवाचे आयोजन

**पुणे 4 जून २०२२** : देशाच्या सार्वजनिक बँकिंग क्षेत्रातील अग्रगण्य बँक असलेल्या बँक ऑफ महाराष्ट्र तर्फे स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवाच्या निमित्त्याने दिनांक ६ जून २०२२ पासून पुणे व नाशिक येथे प्रतिमावर्धन सप्ताहा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमात देशातील ७५ जिल्हे ऑनलाईन सहभागी होणार असून पुणे येथे सिद्धी साज सभागृह व नाशिक येतील रावसाहेब थोरात प्रेक्षागृह , मेराथोन चौक येथे या कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण होईल. माननीय पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी हे दिनांक ६ जून २०२२ रोजी नवी दिल्ली येथील विज्ञान भवनात होणार असलेल्या उद्घाटनाच्या कार्यक्रमाला उपस्थित राहतील. भारताच्या स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवाच्या निमित्त्य दिनांक ६ जून रोजी सदर कार्यक्रम पुणे आणि नाशिकसह देशातील ७५ शहरांमध्ये थेट प्रक्षेपित करण्यात येणार आहे.

पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी यांनी भारताच्या स्वातंत्र्याच्या दिनांक १५ ऑगस्ट २०२२ रोजीच्या ७५व्या वर्धापन दिनाच्या निमित्त्य स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव साजरा करण्यासाठी दिनांक १२ मार्च २०२१ रोजी " आजादी का अमृत महोत्सव " या कार्यक्रम शृंखलेचे उद्घाटन केले होते. " आजादी का अमृत महोत्सव " हा शृंखला कार्यक्रम त्यानंतर दिनांक १५ ऑगस्ट २०२३ पर्यंत सुरु राहील.

" आजादी का अमृत महोत्सव " या शृंखला कार्यक्रमांचा एक भाग म्हणून अर्थ मंत्रालय व कंपनी व्यवहार मंत्रालयाने दिनांक ३० मे २०२२ रोजी एक पत्रकार परिषद घेऊन दिनांक ६ पासून एक आठवडा पर्यंत चालणाऱ्या प्रतिमा वर्धन सप्ताह कार्यक्रमांची एक झलक सादर केली होती.

भारताच्या स्वातंत्र्याच्या ७५ व्या वर्षाचा एक भाग म्हणून " आभार गीत " ( " thank you song ) सादर करण्यात आले होते. यामध्ये कोव्हीड १९ महामारीसारख्या आव्हानात्मक परिस्थितीमध्ये देखील देशाची अर्थव्यवस्था व अर्थप्रणाली सुरळीतपणे सुरु ठेवणाऱ्या अनाम नायकांना मानवंदना देण्यात आली

अर्थ व कंपनी व्यवहार मंत्रालयाने हाती घेतलेल्या नवीन उपक्रमांचे व स्वातंत्र्यापासून आतापर्यंत साध्य केलेल्या कामगिरीचा एक मनोवेधक प्रवास घडवून आणणारी इ – पुस्तिका सादर केली आहे.

प्रतिमा वर्धन सप्ताहाच्या निमित्याने अर्थ व कंपनी व्यवहार मंत्रालयातील प्रत्येक विभाग आपल्या संपन्न इतिहास आणि वारशाचा तसेच यापुढील आव्हानांनां सामोरे जाण्याबाबत लेखाजोखा मांडणार आहे. उदाहरणार्थ तिसऱ्या दिवशी म्हणजेच ६ जून २०२२ रोजी भारतातील रोखे बाजाराचा विकास या विषयावर एक लघुचित्रपट तसेच ११ जून २०२२ रोजी राष्ट्रीय सीमाशुल्क व वस्तू सेवा कर संग्रहालय " धरोहर " या कार्यक्रमात जप्त केलेल्या वस्तू, पुरातन वस्तू, व वारसा वस्तूंचे एक प्रदर्शन देशाला समर्पित करणार आहे.

**निगमित संप्रेषण और निवेशक संबंध**
प्रधान कार्यालय: लोकमंगल, शिवाजीनगर, पुणे-5
टेली -020 :25614495, 25614366, 25514501 से 12 विस्तार

प्रतिमा वर्धन सप्ताहातील अन्य उल्लेखनीय कार्यक्रमात सार्वजनिक प्रापण प्रक्रियेतील सर्वोत्तम प्रक्रियांचे अनुसरण करण्यासाठी आणि त्यामध्ये मूल्यवर्धन होण्यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्याबाबत माहितीसाठी विश्लेषणाच्या आंतरराष्ट्रीय परिषदेत चर्चा करण्यात येईल तसेच प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष करणामध्ये व सार्वजनिक व्यय व्यवस्थापनात कार्यान्वित केलेल्या अनेक सुधारणा येथे प्रदर्शित केल्या जातील.